सकाळ दि० 02/11/15

# नवीन कायद्यात कुलगुरूंना जास्त अधिकार

## संस्थानिक व प्राचार्य, प्राध्यापक, प्राधिकरण सदस्यांचा विरोध : परिसंवादातून नुटा, सुक्टाचा सभात्याग

**संजय देशमुख : सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. १ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत प्रस्तावित ‘महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१५’वर आयोजित परिसंवादाला मोठ्या संख्येत तज्ज्ञ उपस्थित होते; परंतु त्यांना बोलायला संधीच मिळाली नाही. विद्यापीठ कायद्यासंदर्भात केवळ पॉइंट टू पॉइंट बोलण्याची सूचना असताना मी विद्यापीठ उत्पन्नवाढीसाठी काय केले, याचाच पाढा अनेकांनी वाचला. अखेर पालकमंत्री प्रवीण पोटे व उच्चशिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी विद्यापीठ उत्पन्नवाढीसाठी आपण आज चर्चा करीत नाही; केवळ मसुद्यावरच बोलावे, अशा सूचना केल्या.

नवीन विद्यापीठ कायद्यात स्टॅच्यू ऑर्डिनन्स रेग्युलेशनच्या मेकिंग प्रोसेसमध्ये मोठ्या त्रुटी आहेत. एकीकडे अप्रूव्हल, तर दुसरीकडे पासिंग असेच आहे. कुलगुरू काळजी घेत नाहीत आणि प्राधिकरणे विचारत नाहीत, अशी एकंदरीत नवीन विद्यापीठ कायद्याची स्थिती आहे. कुलगुरूंना नवीन कायद्यात देण्यात आलेले जास्तीचे अधिकार म्हणजे सर्व विद्यापीठे डायरेक्ट कुलगुरूच चालविणार, असेच एकूण दिसून येते. यामुळे या परिसंवादाला अतिशय महत्त्व होते.

कुणी कितीही सूचना करा, राज्य सरकार त्रुटींयुक्त व कुलगुरूंना जास्त अधिकार बहाल करणारा हा कायदा लादणार असल्याचे उपस्थितांच्या निदर्शनास आले. परिसंवादात ज्यांनी



बोलायला हवे त्यांना संधीच दिली गेली नसून; शासनाच्या बाजूने बोलणाऱ्याच संधी दिल्याचे जाणवत होते. एकदोन जणांनीच विद्यापीठ मसुद्यात असलेल्या चुकांवर बोट ठेवले. शासन लादत असलेला नवीन कायदा हा विद्यार्थिहिताचा तर नाही; तर तो सध्याच्या शासनकर्त्यांच्या हिताचा असल्याच्या प्रतिक्रिया उमटल्यात.

परिसंवादात विद्यापीठ कायदा विचारवंत म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, त्यात माजी कुलसचिव सी. डी. देशमुख, पी. बी. रघुवंशी, प्राचार्य रघुवंशी, विवेक देशमुख, प्राचार्य अधिष्ठाता डॉ. संतोष ठाकरे, माजी कुलगुरू सुधीर पाटील, माजी प्रकुलगुरू डॉ. जामोदे, माजी कुलसचिव डॉ. नारखेडे, माजी परीक्षानियंत्रक तथा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे संचालक डॉ. बी. आर. वाघमारे, प्राचार्य भांबूरकर आदींना बोलण्याची इच्छा असताना त्यांना संधी देण्यात आली नाही. अखेर नुटाचे अध्यक्ष पी. बी. रघुवंशी व सुक्टाचे अधिष्ठाता व कुलपतीनामित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. संतोष ठाकरे यांसह अनेक सदस्य परिसंवादातून उठून गेले. नवीन कायद्याच्या मसुद्याला आताच विरोध झाला नाही, तर भविष्यात नागरिकांवर पश्चात्तापाची वेळ निश्चित येणार असल्याच्या प्रतिक्रिया या वेळी उमटत होत्या. नवीन कायद्यात सिनेटवर पाच सदस्य हे इलेक्टेड; तर पंधरा कुलगुरूंनी नामित केलेले राहणार आहेत. तीच स्थिती व्यवस्थापन परिषदेत नवीन कायद्यात असल्याने कुलगुरूंवर कोणत्याही प्राधिकरणाचा वचक राहणार नसून; विद्यापीठाचा कारभार एकछत्री चालणार असल्याची शक्यता अनेकांनी बोलून दाखविली.

परिसंवादात पत्रकार अनिल जाधव, प्राचार्य एस. बी. लोहिया, सोमेश्वर पुसदकर, विवेक देशमुख, युवासेनेचे राहुल माटोडे, विद्यार्थी परिषदेचे स्वप्नील पोतदार, कांचनमाला गावंडे, घुईखेडकर यांसह आदींनी आपले मत नोंदविले.